# महाराष्ट्र शासन

## विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय, मुंबई

**जवाहर बालभवन, तळमजला, नेताजी सुभाष मार्ग, चर्नी रोड, मुंबई- ४०० ००**

**दुरध्वनी :- ०२२-२३६३००८१/८६** **ई-मेल: dd.mum@mahedu.gov.in**


---

जा.क्र.शिउसं/ज.र.बदल/२०२५/ १११० दिनांक - 2 1 FEB 2025

प्रति,

मुख्याध्यापक/ प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त उच्च माध्यमिक/ कनिष्ठ महाविदयालय,
मुंबई विभाग, मुंबई.

विषय :- विदयार्थ्यांचे नाव/ आडनाव/ वडीलांचे नाव/ आईचे नावांत बदल/ दुरुस्ती करणेबाबतच्या प्रस्तावांवर करावयाच्या कार्यवाहीबाबत.

संदर्भ :- शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक: ई.गव्ह.१५१७/प्र.क्र.१९/ संगणक. दिनांक १४ ऑगस्ट, २०१७.

उपरोक्त संदर्भिय विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, संदर्भिय शासन निर्णयातील मुद्दा क्र.३.३ अन्वये **"स्टुडंट पोर्टल मध्ये विदयार्थ्याचा नमुद असलेला आधार क्रमांक व नाव याबाबतची माहिती शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान विभागाकडे देण्यात येते आहे. माहिती व तंत्रज्ञान विभाग आधार क्रमांकानुसार विदयार्थ्याचे नाव काय दिसते हे स्पष्ट करेल. जर नावात साम्य असेल तर ती नावे अंतिम केली जातील. त्याप्रमाणे विदयार्थ्यांचे नाव अथवा इतर माहितीबाबत शाळेला कळविले जाईल. त्या आधारे जनरल रजिस्टरला दुरुस्ती करावी. शाळेच्या जनरल रजिस्टरमध्ये आधारप्रमाणे संबंधित विदयार्थ्यांचे नाव असावे"** असे स्पष्ट नमुद आहे.

सबब उपरोक्त शासन निर्णयाच्या अनुषंगाने आपल्या कनिष्ठ महाविदयालयात शिकत असलेल्या विदयार्थी / विदयार्थीनीच्या नाव/ आडनाव/ वडीलांचे नाव /आईचे नाव यामधील जनरल रजिस्टरवरील दुरुस्तीबाबतच्या प्रकरणांवर आपल्या स्तरावर कार्यवाही करण्यात यावी.

(संदीप संगवे)
विभागीय शिक्षण उपसंचालक,
मुंबई.